# जनसंपर्क अधिकारी कार्यालय, पालघर

**P.R.O. Office,Palghar**
phone no 02525-297032,Mo No 8669604078
Address-sp office Bidco Road,Palghar west
E-Mail- propalghar@gmail.com


## प्रेसनोट क्र. ४७० दिनांक २५/०५/२०२०

## वालीव पोलीस ठाणे यांचेकडुन तंबाखुजन्य पदार्थांची वाहतुक करणा-या आरोपीतांना जेरबंद करुन ३९,९५,८४०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त

दि. २४/०५/२०२० रोजी १७.२० वाजताचे सुमारास वालीव पोलीस ठाणे हद्दीतील गुजरात मुंबई वाहीनीवर (महामार्गावर) चिंचोटी पुलाचे कोपऱ्यावर, वसई पुर्व, ता.वसई, जि. पालघर येथे आरोपीत १) कांतीलाल मंजी मिना वय २५ वर्षे, रा.मु.पो.बिच्छीवाडा ता. बिच्छीवाडा जि.डुंगुरपुरा राज्य-राजस्थान २) शौकत खुशलअली पठाण रा. काशीमीरा रोड जि.ठाणे ३) संतोष पुर्ण नाव व पत्ता माहिती नाही यांनी महाराष्ट्र शासनाने तंबाखुजन्य अन्न पदार्थासंबधात जारी केलेल्या प्रतिबंधीत ओदशाची अवज्ञा करुन तसेच माननीय जिल्हाधिकारी सो, यांचे नमुद मनाई आदेशाचा भंग केला. तसेच मानवी जिवीतास धोकादायक असलेला कोरोना रोगाचा ससंर्ग पसरविण्याचा संभव असताना हयगयीची घातकी कृती करुन अपायकारक खादय पदार्थांची विक्री करण्याचे उद्देशाने माल आपले कब्जात बाळगुन विक्रीकरीता घेवुन जात असतांना मिळुन आले. आरोपीत यांचे ताब्यातुन १) १९,९५,८४०/-रुपये किंमतीच्या ४४ पांढऱ्या रंगाचे प्लॉस्टीकचे कार्टुन असुन प्रत्येक कार्टुन मध्ये एकुन ६ पांढऱ्या रंगाच्या गोण्या दिसत आहे. नमुद प्रत्येक गोणीमधे प्रत्येकी १४०/-रु किमतीचे मोरपंखी/जांभळया रंगाचे ५४ पाकिटे असुन त्यावर इंग्रजी मध्ये ठळक कॅपीटल अक्षरात A पाकिटाचे खालील बाजुस EKKA PREMIUM असे लिहलेले दिसत आहे. २)१५,००,०००/- रुपये किंमतीचा एक एम.एच ०४ जी.आर.६४६९ क्रमांकाचा तपकिरी रंगाचा १० टायर कंन्टेनर असा एकुण ३४,९५,८४०/- रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असुन आरोपीत यांचे विरुध्द वालीव पोलीस ठाणे गु.र.नं. I ५५३/२०२० भा.दं.वि.सं.कलम ३२८, २६९, २७०, २७३, १८८ सह अन्न सुरक्षा मानदे अधिनियम कलम २६(२),४, ३०(२)(ए) व आपत्ती व्यवस्थापन अधीनीयम २००५ मधील कलम ५१(ब) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर गुन्हयातील आरोपीत यांना दिनांक २४/०५/२०२० रोजी अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. विलास चौगुले, वालीव पोलीस ठाणे यांचे मार्गदर्शनाखाली वालीव पोलीस ठाणेचे अधिकारी व कर्मचारी यांनी केली आहे.

Scanned by CamScanner